क्र.एन/ ८९३ /२०२६
दि. २५.०६.२०२६

**-: जाहिर नोटीस :-**

जिल्हा न्यायालय सोलापूर व त्या अधिनस्त येणा-या स्थानिक न्यायालयातील नियमानुसार नाश करण्यात आलेल्या अभिलेखाची (रेकॉर्ड) नवीन व जुनी रद्दी तसेच, न्यायालयांकरिता खरेदी करण्यात आलेल्या कुलर्स, संगणक, प्रिंटर इत्यांदीचे बॉक्स विक्री करणेचे आहे. त्याकरिता या जाहिर नोटीसीद्वारे रद्दी खरेदीदाराकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

**-: नियम व अटी :-**

१. सदर जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून दि. ०२.०७.२०२६ पर्यंत जिल्हा न्यायालय सोलापूर येथे **मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश सोलापूर** यांच्या नावाने बंद लखोटयात दरपत्रक सादर करावे. लखोटयावर **"रद्दी खरेदी बाबत दरपत्रक"** असे नमुद करण्यात यावे.

२ मुदती नंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

३ **रद्दीचा दर खालीलप्रमाणे नमूद करावा. इतर प्रकारे दर नमूद केल्यास दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही व त्यास निविदाकार जबाबदार राहतील. तसेच त्याबाबत नंतर कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.**

| अ.क्र. | रद्दी तपशील | प्रति किलो दर रु. |
|---|---|---|
| १. | नवीन कागदपत्रांची रद्दी | |
| २. | जुन्या कागदपत्रांची रद्दी | |
| ३. | संगणक व इतर साहित्यांचे रिकामे बॉक्स | |

४ रद्दी या कार्यालयाकडून वेळोवेळी देण्यात येणा-या सुचनेनुसार प्रत्यक्ष जागेवर जाऊन, आहे त्या स्थितीमध्ये इलेक्ट्रॉनिक वजन काटयाद्वारे वजन करुन, संबंधीत कार्यालयात त्याची होणारी रक्कम रोख स्वरुपात जमा केल्यानंतरच रद्दी ताब्यात घ्यावयाची आहे.

५ त्यासाठी लागणारे बारदाना, रद्दी खरेदीदाराने आणावयाचा आहे. तसेच, वाहतुक खर्चही त्यांनीच करावयाचा आहे.

६ दरपत्रके ही कार्यालयीन वेळी (सकाळी १०.३० ते सायं. ५.००) सुटीचे दिवस सोडून **"बंद लखोटयात"** आणुन दयावीत.

७ रद्दीचे कोणतेही दरपत्रक मंजुर करण्याचा अगर कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार "मा.प्रमुख जिल्हा न्यायाधीश सोलापूर" यांनी स्वत: कडे राखून ठेवला आहे.

आदेशावरुन,

सहा. अधिक्षक

प्रबंधक
जिल्हा न्यायालय, सोलापूर

प्रत.

१. जिल्हा न्यायालय, सोलापूर अधिकृत संकेतस्थळ

२. जिल्हा न्यायालय, सोलापूर नोटीस बोर्ड